# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **दि. १५ मार्च २०२०**

# पुण्यतिथीनिमित्त पं. बच्छराज व्यास यांना मनपातर्फे अभिवादन

**नागपूर, ता. १५ :** भारतीय जनसंघाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक, विधानपरिषदेचे माजी सदस्य पंडित बच्छराजजी व्यास यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाल येथील पं. बच्छराज व्यास चौक स्थित अर्धाकृती पुतळ्याला मनपातर्फे गांधीबाग झोन सभापती वंदना यंगटवार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी पं. बच्छराज व्यास प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार गिरीश व्यास, ॲड. कैलास व्यास, नगरसेवक राजेश घोडपागे, नगरसेविका श्रद्धा पाठक, ॲड. नचिकेत व्यास, प्रा. प्रमोद पेंडके, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे सुभाष पारधी, किशोर पलांदुरकर, दशरथ मस्के, हरिभाऊ ढोरे, आशीष भुते, संजय चिंचोळे, शिवाजी शिरसाठ, विनोद आष्टीकर, गजानन नेरकर, रवि वड्याळकर, प्रितेश आमले, जितेंद्र नागपूरकर, मालतीबाई बढिये, कविता इंगळे, अनिता काशीकर, दधिच समाजाचे ओमप्रकाश आचार्य, महेश तिवारी, अनुराग तिवारी, अर्जुन तिवारी, मनोज तिवारी आदी उपस्थित होते.